पालखी मार्ग, मुक्कामाची ठिकाणे, दिंड्यांच्या विश्रांतीची ठिकाणे, सोसायट्या आणि धर्मशाळा परिसरात विशेष नियोजन करण्यात आले आहे. स्वच्छतेला प्राधान्य देत एकूण १,००९ फिरती शौचालये उभारण्यात आली असून जर्मन तंबू परिसरात आणखी १०० फिरत्या शौचालयांची व्यवस्था करण्यात येणार आहे. वाढत्या भाविकसंख्येचा विचार करून स्वच्छता कर्मचाऱ्यांचे अतिरिक्त मनुष्यबळही नियुक्त करण्यात आले आहे.सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वाच्या चौकांमध्ये आणि गर्दीच्या ठिकाणी ४० सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. या माध्यमातून पालखी मार्गावरील हालचालींवर सातत्याने लक्ष ठेवले जाणार असून कोणतीही आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास तातडीने प्रतिसाद देता येणार आहे.

भाविकांना पिण्याच्या पाण्याचा पुरेसा पुरवठा व्हावा यासाठी २२ ठिकाणी पाण्याच्या टँकरची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच रात्रीच्या वेळी पालखी मार्ग आणि मुक्कामस्थळी पुरेसा उजेड राहावा यासाठी महत्त्वाच्या ठिकाणी विद्युत प्रकाशझोत उभारण्यात आले आहेत. इंद्रायणी नदी परिसरात महिलांसाठी स्वतंत्र वस्त्रपरिवर्तन कक्षाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. याशिवाय प्रत्येक दिंडीला प्राथमिक उपचार पेटी देण्यात येणार असून आरोग्यविषयक किंवा प्रवासाशी संबंधित मदतीसाठी एकाच ठिकाणी संपर्क कक्ष कार्यरत ठेवण्यात आला आहे. आपत्कालीन परिस्थितीत भाविकांना त्वरित मदत मिळावी यासाठी संबंधित विभागांमध्ये समन्वय ठेवण्यात आला आहे. देहूनगर पंचायत प्रशासनाने पालखी सोहळा सुरक्षित, स्वच्छ आणि सुरळीत पार पडावा यासाठी सर्वंकष नियोजन केले असून वारकरी भाविकांना कोणतीही अडचण निर्माण होऊ नये यासाठी आवश्यक त्या सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली.

## युरोपमध्ये उष्णतेच्या लाटेने हाहाकार; फ्रान्ससह अनेक देशांमध्ये हजारो नागरिकांचा मृत्यू

**पॅरिस, दि. ०४ (वार्ताहर) :** युरोप खंडात आलेल्या विनाशकारी उष्णतेच्या लाटेने हजारो लोकांचा बळी घेतला आहे. फ्रान्समध्ये जूनच्या शेवटच्या आठवड्यात तीव्र तापमानामुळे मृत्यूच्या प्रमाणात तब्बल २९ टक्क्यांनी वाढ झाली आहे. फ्रान्सच्या आरोग्य प्राधिकरणाने दिलेल्या माहितीनुसार, २२ ते २८ जून या कालावधीत २,०२५ अतिरिक्त मृत्यूची नोंद झाली आहे.

आरोग्य मंत्री स्टेफनी रिस्ट यांनी सांगितले की, ४५ वर्षांपेक्षा जास्त वयाच्या लोकांमध्ये हा मृत्यूदर सर्वाधिक आहे. फ्रान्समध्ये २४ जून रोजी इतिहासातील सर्वात गरम दिवसाची नोंद झाली, जेव्हा पॅरिसमधील तापमान ४१ अंश सेल्सिअसच्या जवळ पोहोचले होते आणि अर्ध्याहून अधिक देशाला रेड हीट अलर्ट जारी करण्यात आला होता. पॅरिस परिसरातील मृत्यूदर ६२ टक्क्यांनी वाढल्याने अंतिम मृतांचा आकडा आणखी मोठा असण्याची भीती व्यक्त होत आहे.

ही उष्णतेची लाट फ्रान्सपुरती मर्यादित नसून बेल्जियममध्ये नेहमीपेक्षा ३९ टक्के जास्त म्हणजेच १,२२२ अतिरिक्त मृत्यू झाले आहेत, ज्यामध्ये ८५ वर्षांवरील वृद्धांचा समावेश आहे. नेदरलँड्समध्येही तापमान ४० अंशांच्या जवळ गेल्याने ४८० हून अधिक वृद्धांचा मृत्यू झाला आहे. दुसरीकडे, कडक उन्हापासून वाचण्यासाठी नद्या आणि तलावांमध्ये उतरलेल्या ७२ लोकांचा बुडून मृत्यू झाल्याची माहिती गृहमंत्री लॉरेंट नुनेझ यांनी दिली.

हवामान तज्ज्ञांनी चेतावणी दिली आहे की स्पेन, पोर्तुगाल आणि दक्षिण ब्रिटनमध्ये पुन्हा एक नवीन उष्णतेची लाट निर्माण होत आहे. दक्षिण फ्रान्समध्ये वणव्यांमुळे रेड अलर्ट जारी करण्यात आला असून उन्हाळ्याच्या सुरुवातीपासून आतापर्यंत ७,००० आगीच्या घटनांमध्ये ८,७०० हेक्टर जमीन जळाली आहे,

# निकृष्ट 'नो पार्किंग' फलकांवरून वाई पालिकेवर प्रश्नचिन्ह



**वाई, दि. ०४ (वार्ताहर) :** वाई शहरात बसविण्यात आलेल्या 'नो पार्किंग' व फेरीवाला पार्किंग फलकांच्या दर्जावरून नगरपालिकेच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात येत आहे. निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरल्याचा आरोप करत नागरिकांनी या कामाची स्वतंत्र तांत्रिक चौकशी करून संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी केली आहे. महागणपती पुलासह शहरातील विविध ठिकाणी बसविण्यात आलेले फलक मजबूत पायाभरणी न करता पत्र्याच्या कुंडीत सिमेंट भरून उभारण्यात आल्याचा आरोप होत आहे. त्यामुळे हे फलक किती दिवस टिकणार आणि सार्वजनिक सुरक्षेच्या दृष्टीने ते कितपत सुरक्षित आहेत, असा सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे.

शहराच्या विकासाच्या नावाखाली या कामाचा सोशल मीडियावर गाजावाजा करण्यात आला होता. मात्र प्रत्यक्ष कामाचा दर्जा समाधानकारक नसल्याची चर्चा सुरू असून, सार्वजनिक निधीचा अपव्यय झाल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.

या प्रकरणी सत्ताधारी तसेच विरोधी पक्षातील नगरसेवकांनी कोणतीही भूमिका घेतलेली नसल्याने त्यांच्या मौनावरही प्रश्न उपस्थित होत आहेत. जनहिताच्या प्रश्नांवर विरोधी पक्षाने प्रशासनाला जाब विचारणे अपेक्षित असताना तसे होत नसल्याची टीका नागरिकांकडून केली जात आहे.

याशिवाय, ज्या ठिकाणी मोठ्या आणि स्पष्ट दिसणाऱ्या फलकांची आवश्यकता आहे, तेथे लहान आकाराचे फलक बसविण्यात आल्याचाही आक्षेप घेण्यात आला आहे. या कामाचा आराखडा, साहित्याची गुणवत्ता आणि खर्चाची चौकशी करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

महागणपती पुलासह शहरातील सर्व फलकांच्या कामाचे स्वतंत्र तांत्रिक परीक्षण करून दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## पावसाळी अधिवेशनापूर्वी काँग्रेसचा केंद्र सरकारवर हल्लाबोल

### घटनात्मक संस्थांच्या गैरवापराचा आरोप

**नवी दिल्ली, दि. ०४ (वृत्तसंस्था) :** संसदेच्या पावसाळी अधिवेशनापूर्वी काँग्रेसने भाजपच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारवर 'बदल्याचे राजकारण' आणि घटनात्मक संस्था कमकुवत केल्याचा गंभीर आरोप केला आहे.

काँग्रेस सरचिटणीस जयराम रमेश यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, संसदेत दोन तृतीयांश बहुमत न मिळाल्याने भाजप निराश झाला असून राजकीय उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विरोधी पक्ष फोडण्याचा प्रयत्न करत आहे. मतदारसंघांच्या पुनर्रचना विधेयकाचा संदर्भ देत त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांच्यावर विरोधकांचा बदला घेतल्याचा आरोप केला. भाजपचा खरा उद्देश आरक्षण आणि सामाजिक न्यायाशी संबंधित घटनादुरुस्ती करण्याचा आहे, म्हणूनच त्यांनी निवडणुकीत ४०० पारचा नारा दिला होता, असा दावा त्यांनी केला.

जयराम रमेश यांनी निवडणूक आयोगाच्या स्वायत्ततेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले. ते म्हणाले की, द्रमुक, आम आदमी पक्षासह २४ राजकीय पक्षांनी आणि अपक्ष खासदार कपिल सिबल यांनी सरन्यायाधीशांना पत्र लिहून मतदार यादीच्या विशेष पुनर्रचना प्रक्रियेत मतदारांची नावे गाळल्याबद्दल आणि आयोगाच्या पक्षपाती कारभाराबद्दल चिंता व्यक्त केली आहे.

पश्चिम बंगाल, बिहार, महाराष्ट्र आणि हरियाणा या राज्यांमध्ये निवडणूक आयोगाच्या तटस्थतेवर गंभीर प्रश्न निर्माण झाले असून, सर्वोच्च न्यायालयाने आयोगाला निष्पक्षपणे काम करण्याचे निर्देश द्यावेत, अशी आशा त्यांनी व्यक्त केली. तसेच या अधिवेशनात 'एक देश, एक निवडणूक' प्रस्ताव पुन्हा आणला जाऊ शकतो, असा दावा करून

# शासकीय अपडेट्स आता व्हॉट्सअ‍ॅप चॅनल, पब्लिक अ‍ॅपवर

### माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाची अधिकृत खाती सुरू; नागरिकांना शासकीय निर्णय, योजना व घडामोडींची थेट, अचूक माहिती उपलब्ध

**मुंबई, दि. ०४ (प्रतिनिधी) :** महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने नागरिकांपर्यंत अचूक, अधिकृत आणि वस्तुनिष्ठ माहिती जलदगतीने पोहोचविण्यासाठी आता अधिकृत व्हॉट्सअ‍ॅप चॅनल आणि पब्लिक अ‍ॅपवरील प्रमाणित खाते सुरू केले आहे. या माध्यमातून शासकीय निर्णय, योजना, उपक्रम तसेच विविध घडामोडींचे थेट अपडेट्स नागरिकांना उपलब्ध होणार आहेत.

महासंचालनालयाचे व्हॉट्सअ‍ॅप चॅनल 'DGIPR, Govt of Maharashtra' या नावाने, तर पब्लिक अ‍ॅपवर 'महाराष्ट्र शासन (@mahadgipr)' या नावाने सुरू करण्यात आले आहे. या नव्या डिजिटल उपक्रमामुळे नागरिकांना शासनाची अधिकृत माहिती थेट आणि वेगाने मिळणार असून अफवा व चुकीच्या माहितीला आळा घालण्यासही मदत होणार आहे.

शासन आणि जनतेमधील महत्त्वाचा दुवा म्हणून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय कार्यरत आहे. शासनाच्या विविध योजना, निर्णय आणि लोकोपयोगी उपक्रमांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्याबरोबरच जनतेच्या प्रतिक्रिया शासनापर्यंत पोहोचविण्याची जबाबदारीही ही यंत्रणा पार पाडते. डिजिटल माध्यमांचा वाढता वापर लक्षात घेऊन महासंचालनालयाने आता हायपरलोकल कंटेंटसाठी ओळखल्या जाणाऱ्या पब्लिक अ‍ॅपवर तसेच व्हॉट्सअ‍ॅप चॅनलवर अधिकृत उपस्थिती नोंदविली आहे. याशिवाय महासंचालनालयाची अधिकृत माहिती महासंवाद संकेतस्थळासह एक्स, फेसबुक, इन्स्टाग्राम, युट्यूब, टेलिग्राम आणि डेलीहंट या विविध समाजमाध्यमांवरही उपलब्ध आहे.

दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अनुसूचित जाती व जमाती अत्याचार प्रतिबंधक (अ‍ॅट्रॉसिटी) कायद्यांतर्गत दाखल गुन्ह्यांमध्ये दोषसिद्धीचे प्रमाण वाढविण्याचे निर्देश पोलीस व सरकारी वकिलांना दिले. विधान भवन येथे झालेल्या राज्यस्तरीय दक्षता व संनियंत्रण समितीच्या बैठकीत त्यांनी विशेष कायद्यांतील खटल्यांना गती देण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यावर भर दिला.राज्यात अ‍ॅट्रॉसिटीचे गुन्हे अधिक असलेल्या जिल्ह्यांमध्ये जलदगती न्यायालये स्थापन करण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली.

## संसदेचे पावसाळी अधिवेशन २० जुलैपासून सुरू होणार; किरण रिजिजू यांची घोषणा

**नवी मुंबई, दि. ०४ (वार्ताहर) :** संसदेचे आगामी पावसाळी अधिवेशन २० जुलैपासून सुरू होणार असून ते १३ ऑगस्टपर्यंत चालणार आहे. केंद्रीय संसदीय कामकाज मंत्री किरण रिजिजू यांनी शनिवारी सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर ही घोषणा केली. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी दोन्ही सभागृहे बोलावण्याच्या सरकारच्या शिफारशीला मंजुरी दिली आहे.

रिजिजू यांनी सांगितले की, राष्ट्रीय महत्त्वाच्या मुद्द्यांवर अर्थपूर्ण चर्चा, वादविवाद आणि निर्णय घेण्यासाठी हे अधिवेशन बोलावण्यात आले आहे. या अधिवेशनात सरकार अनेक महत्त्वाची विधेयके मांडणार असून, विरोधकही आर्थिक, राजकीय आणि जनहिताच्या मुद्द्यांवरून सरकारला घेरण्याची शक्यता आहे.

## महिलांना सक्षम करण्यासाठी 'पिंक ई-रिक्षा' योजनेचा विस्तार ; ५ हजार महिलांना रोजगाराची संधी

**मुंबई, दि. ०४ (प्रतिनिधी) :** महिला उद्योजकतेला चालना देण्यासाठी आणि महिलांचा सार्वजनिक प्रवास सुरक्षित करण्यासाठी महाराष्ट्र सरकारने आपल्या 'पिंक ई-रिक्षा' योजनेचा मोठ्या प्रमाणावर विस्तार करण्याची घोषणा केली आहे. महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी विधानपरिषदेत माहिती दिली की, चालू आर्थिक वर्षात राज्यातील किमान ५,००० महिलांना ई-रिक्षा उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट सरकारने ठेवले आहे. या योजनेची सुरुवात २०२४ मध्ये पुणे, नाशिक, नागपूर, अहिल्यानगर, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, कोल्हापूर आणि सोलापूर या आठ प्रमुख शहरांमध्ये पथदर्शी प्रकल्प म्हणून



झाली होती, परंतु आता ही योजना राज्यातील सर्व नगरपरिषद क्षेत्रांमध्ये लागू केली जाणार आहे.

या योजनेची आर्थिक रचना त्रिपक्षीय असून यामध्ये राज्य सरकार २० टक्के अनुदान देते, बँक ७० टक्के कर्ज पुरवते आणि उर्वरित १० टक्के रक्कम लाभार्थी महिलेला स्वतः भरावी लागते. व्यवसाय आणि दीर्घकालीन शाश्वततेसाठी महिलांचा स्वतःचा १० टक्के वाटा असणे बंधनकारक करण्यात आले आहे. या योजनेचा आर्थिक फायदा थेट महिलांनाच मिळावा यासाठी लाभार्थी महिलेने स्वतःच ते वाहन चालवणे सक्तीचे आहे. आरटीओ कार्यालयातील नोकरशाहीच्या अडचणी दूर करण्यासाठी परिवहन विभाग आता विशेष सत्रे आयोजित करून परवाना आणि नोंदणी प्रक्रिया सुलभ करणार आहे. या योजनेला मोठा प्रतिसाद मिळाला असून जिल्हास्तरीय समित्यांकडे ९,९४० अर्ज आले आहेत, ज्यांची छाननी करून टप्प्याटप्प्याने वाटप केले जाईल.

# टीईटी पेपरफुटी प्रकरणात आणखी तीन जणांना अटक



**ठाणे, दि. ०४ (वार्ताहर) :** भिवंडी टीईटी पेपरफुटी प्रकरणाच्या तपासात पोलिसांना आणखी एक मोठे यश मिळाले असून या प्रकरणात आणखी तीन जणांना अटक करण्यात आली आहे. नरेशकुमार पुरणचंद माहोर, संजयकुमार सुरेशचंद्र शर्मा आणि बाबूलाल नारायणसिंह कुशवाहा अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. या तिन्ही आरोपींना उत्तर प्रदेशातील आग्रा येथून ताब्यात घेण्यात आले असून त्यांना भिवंडी न्यायालयासमोर हजर करण्यात आले. न्यायालयाने तिन्ही आरोपींना 9 जुलैपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. या अटकेनंतर टीईटी पेपरफुटी प्रकरणातील अटक आरोपींची संख्या दहावर पोहोचली आहे.

प्राथमिक तपासात महिम पत्रण प्रा. लि. या आग्रा येथील प्रिंटिंग प्रेसमधून प्रश्नपत्रिका बाहेर काढण्याच्या कटात या तिन्ही आरोपींचा थेट सहभाग असल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. प्रश्नपत्रिका छपाई प्रक्रियेदरम्यान गोपनीय माहिती बाहेर काढून ती रॅकेटमार्फत संबंधित व्यक्तींपर्यंत पोहोचवण्यात आल्याचा तपास यंत्रणांचा प्राथमिक अंदाज आहे. या संपूर्ण साखळीचा उलगडा करण्यासाठी आरोपींकडे कसून चौकशी सुरू असून अनेक महत्त्वाचे धागेदोरे पोलिसांच्या हाती लागण्याची शक्यता आहे.

या प्रकरणाचे धागेदोरे महाराष्ट्राबाहेर बिहार, हरियाणा, दिल्ली, आग्रा तसेच इतर राज्यांपर्यंत पोहोचल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. आरोपींकडून जप्त करण्यात आलेल्या धनादेशांची पडताळणी, आर्थिक व्यवहारांची चौकशी, मोबाईल आणि डिजिटल पुराव्यांचे विश्लेषण तसेच या रॅकेटमधील इतर साथीदारांचा शोध घेण्याचे काम वेगाने सुरू आहे. या संघटित रॅकेटमध्ये आणखी काही जणांचा सहभाग असल्याची शक्यता नाकारता येत नसल्याने तपासाची व्याप्ती वाढवण्यात आली आहे.

प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या गुन्हे शाखेमार्फत विशेष तपास पथक अर्थात एसआयटीची स्थापना करण्यात आली आहे. डीसीपी पवन बनसोड यांच्या नेतृत्वाखाली हे पथक राज्यासह देशातील विविध भागांमध्ये या रॅकेटचे नेटवर्क उघड करण्यासाठी काम करत आहे. तपासासाठी पोलिसांची विशेष पथके हरियाणा, बिहार आणि दिल्ली येथे रवाना झाली असून संबंधित व्यक्तींची माहिती गोळा केली जात आहे.

**सार्वजनिक सूचना**

श्री. साईनाथ कल्याणम सुंदरम हे पंचपाखाडी, ठाणे, ता. व जि. ठाणे येथील स्वर्गंधा को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी (प्रस्तावित) मधील "सी" विंग, दुसरा मजला, फ्लॅट क्र. ४२, क्षेत्रफळ अंदाजे ५९० चौ. फूट यांचे मालक व कब्जेदार होते. त्यांचे दिनांक २१ फेब्रुवारी २०२३ रोजी मुंबई येथे कोणतेही मृत्युपत्र (Will) न करता निधन झाले.

त्यांच्या पश्चात त्यांचे वर्ग-१ (Class-I) कायदेशीर वारस व प्रतिनिधी म्हणून फक्त त्यांच्या पत्नी सौ. भवानी साईनाथ सुंदरम, पुत्र श्री. विघ्नेश साईनाथ सुंदरम व विवाहित कन्या सौ. प्रिती साईनाथ सुंदरम हेच जिवंत असून इतर कोणताही वारस नाही.

सौ. भवानी साईनाथ सुंदरम यांनी इतर कायदेशीर वारसदार श्री. विघ्नेश साईनाथ सुंदरम (पुत्र) व सौ. प्रिती साईनाथ सुंदरम (विवाहित कन्या) यांच्या संमती व ना-हरकत प्रमाणपत्राच्या आधारे वरील फ्लॅटचे मालकी हक्क/भागभांडवल (शेअर्स) दिवंगत श्री. साईनाथ कल्याणम सुंदरम यांच्या नावावरून त्यांच्या स्वतःच्या नावावर हस्तांतरित करण्यासाठी अर्ज केला आहे.

त्यामुळे सदर फ्लॅटबाबत कोणत्याही व्यक्ती, संस्था किंवा वारसदारास कोणताही हक्क, मालकी, स्वारस्य, दावा अथवा हरकत असल्यास त्यांनी या सूचनेच्या प्रसिद्धीपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत आवश्यक पुराव्यांसह आपला लेखी दावा/हरकत खालील पत्त्यावर सादर करावी.

ॲड. अरुणकुमार गुणसेकरन
गुणसेकरन असोसिएट्स
दुकान क्र. ४, स्वप्न सागर सीएचएसएल,
स्वप्न नगरी, मुलुंड (पश्चिम), मुंबई – ४०००८०.
कार्यालयीन वेळ : सकाळी ११.०० ते दुपारी ४.००.

सदर कालावधीत कोणतीही हरकत, दावा किंवा अर्ज प्राप्त न झाल्यास संबंधित व्यवहारास कोणतीही हरकत नसल्याचे गृहीत धरून फ्लॅटचे हस्तांतरण पूर्ण करण्यात येईल. तसेच, प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ दिवसांनंतर प्राप्त होणारे कोणतेही अर्ज, दावे किंवा हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत.

**गुणसेकरन असोसिएट्स यांचेकडून**
**सही/-**
**ॲड. अरुणकुमार गुणसेकरन**

**कोगटा फायनान्शियल (इंडिया) लिमिटेड**
**सीआयएन क्रमांक: U67120RJ1996PLC011406, नोंदणीकृत कार्यालय:** एस-१ गोपालबारी, अजमेर पुलियाजवळ, मेट्रो पिलर क्र. १४३ च्या समोर, जयपूर – ३०२००१

**परिशिष्ट ४ [नियम ८(१) पहा] ताबा सूचना**

ज्याअर्थी, 'कोगटा फायनान्शियल (इंडिया) लिमिटेड'चे प्राधिकृत अधिकारी म्हणून, 'सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२' (सरफेसी कायदा) अन्वये आणि 'सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रूल्स, २००२' च्या नियम ३ सह वाचल्या जाणाऱ्या कलम १३ (१२) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून, खाली सही करणाऱ्या अधिकाऱ्याने दि. १७.०१.२०२६ रोजी एक मागणी नोटीस जारी केली होती; ज्याद्वारे कर्जदार/हमीदार/तारणकर्ता - **श्री. दर्शन सुनील शाह (वडील: श्री. सुनील भिकलाल शाह) (अर्जदार), एचयूडीटी इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (वायस्काउट ॲनालिस्ट लेव्हल्स - श्री. दर्शन सुनील शाह), श्री. सुनील भिकलाल शाह (वडील: श्री. भिकलाल शाह) (सह-अर्जदार), सौ. बिनल सुनील शाह (पती: श्री. सुरेश भाई डाह्या लाल शाह) (सह-अर्जदार), सौ. कमलाबेन भिकलाल शाह (वडील: लालधोत लामा) (सह-अर्जदार/तारणकर्ता) कर्ज खाते क्र. ००००५४३१७९** यांना सूचित करण्यात आले होते की, त्यांनी नोटीसमध्ये नमूद केलेली रक्कम म्हणजेच **दि. १५.०१.२०२६** रोजी देय असलेली **रु. ३१,२४,७१०/- (अक्षरी रुपये एकतीस लाख चोवीस हजार सातशे दहा फक्त),** तसेच त्यावर पुढील व्याज आणि इतर कायदेशीर शुल्क, नोटीसच्या तारखेपासून किंवा सदर नोटीस मिळाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत पूर्णपणे अदा करावेत.

कर्जदार/तारणकर्ता यांनी रक्कम परत करण्यात कसूर केल्यामुळे, कर्जदार/तारणकर्ता आणि सर्वसाधारण जनतेस याद्वारे सूचित करण्यात येते की, खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा ताबा, संबंधित कायद्याच्या कलम १३(४) अन्वये आणि संबंधित नियमावलीतील नियम ८ नुसार प्राप्त अधिकारांचा वापर करून, **४ जुलै २०२६** रोजी माझ्याद्वारे घेण्यात आला आहे.

तारण ठेवलेली मालमत्ता परत मिळवण्यासाठी उपलब्ध असलेल्या कालावधीबाबत, कायद्याच्या कलम १३ च्या पोट-कलम (८) मधील तरतुदींकडे कर्जदाराचे लक्ष वेधण्यात येत आहे.

कर्जदार/तारणकर्ता आणि सर्वसाधारण जनतेस याद्वारे सावध करण्यात येते की, या मालमत्तेबाबत कोणताही व्यवहार करू नये; मालमत्तेबाबतचा कोणताही व्यवहार 'कोगटा फायनान्शियल (इंडिया) लिमिटेड'च्या बोज्याच्या अधीन असेल. हा बोजा **१५.०१.२०२६** रोजीच्या स्थितीनुसार **३१,२४,७१०/- रुपये (अक्षरी: एकतीस लाख चोवीस हजार सातशे दहा रुपये)** इतका असून, त्यावर पुढील व्याज, कायदेशीर खर्च आणि पूर्ण परतफेडीपर्यंतचे व्याज व इतर खर्च देय असतील.

**अचल मालमत्तेचे वर्णन**

"ब्रह्मा इस्टेट" या नावाने ओळखल्या जाणाऱ्या 'सी-१' विंगमधील आणि "ब्रह्मा इस्टेट कमर्शियल प्रिमिसेस को-ऑप. सोसायटी लि." या सोसायटीमधील, जमिनीच्या पातळीवर तळ मजला येथे स्थित असलेल्या व २२.५३ चौ.मी. म्हणजेच २४२ चौ. फूट इतके बिल्ट-अप क्षेत्रफळ असलेल्या 'दुकान क्र. १६' या मालमत्तेचा संपूर्ण भाग. ही मालमत्ता मौजे कोंढवा, तालुका हवेली, जिल्हा पुणे, महाराष्ट्र - ४११ ०४८ येथील सर्व्हे क्र. १ए/१/२ वरील जमिनीवर उभारण्यात आली आहे. सदर दुकान श्रीमती कमलाबेन भिकलाल शहा यांच्या मालकीचे आहे.

मालमत्तेच्या सीमा खालीलप्रमाणे आहेत - पूर्व - सार्वजनिक रस्ता, पश्चिम - सब-प्लॉट क्र. २, उत्तर - अंतर्गत रस्ता, दक्षिण - मोकळी जागा.

**दिनांक: ०४.०७.२०२६** **प्राधिकृत अधिकारी**
**स्थळ: कोंढवा, पुणे** **कोगटा फायनान्शियल (इंडिया) लिमिटेड**

**बँक ऑफ़ बड़ौदा Bank of Baroda**

**प्रादेशिक ताणग्रस्त मालमत्ता वसुली शाखा, एमएमडब्ल्यूआर, ६ वा मजला, बडोदा हाऊस, दिवाण शॉपिंग सेंटरच्या मागे, एस.व्ही. रोड, जोगेश्वरी (पश्चिम), मुंबई - ४००१०२, ई-मेल: sarmmw@bankofbaroda.co.in**

**{नियम ८ (१)}**
**ताबा घेण्याबाबतची सूचना**
**(अचल मालमत्तेसाठी)**

**ज्याअर्थी,**
खाली सही करणारे अधिकारी, जे 'बँक ऑफ बडोदा'च्या आरओएसएआरबी, एमएमडब्ल्यूआर शाखेचे 'प्राधिकृत अधिकारी' आहेत, त्यांनी 'सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२' (सरफेसी कायदा) अंतर्गत आणि 'सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रूल्स, २००२' च्या नियम ३ सह वाचल्या जाणाऱ्या कलम १३ (१२) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून, दिनांक ०२.०९.२०२४ रोजी एक 'मागणी नोटीस' जारी केली होती. या नोटिशीद्वारे कर्जदार **मेसर्स. मयेकर अँड सन्स (मालक: दिपल रोकाडिया), श्री. प्रफुल्ल रोकाडिया (जामीनदार) आणि श्री. जिग्नेश रोकाडिया (जामीनदार)** यांना, ३१.०८.२०२४ रोजीची थकबाकी रक्कम **रु. ५४,२४,९४३.४७ (अक्षरी रुपये चौपन्न लाख चोवीस हजार नऊशे त्रेचाळीस आणि पैसे सत्तेचाळीस मात्र) तसेच त्यावर होणारे व्याज आणि इतर शुल्क,** सदर नोटीस मिळाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत परतफेड करण्यास सांगण्यात आले होते.

कर्जदाराने सदर रकमेची परतफेड न केल्यामुळे, कर्जदार आणि सर्वसाधारण जनतेस याद्वारे सूचित करण्यात येते की, खाली सही करणाऱ्या अधिकाऱ्याने 'सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रूल्स, २००२' च्या नियम ८ सह वाचल्या जाणाऱ्या कायद्याच्या कलम १३ च्या पोट-कलम (४) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून, **दिनांक २ जुलै २०२६** रोजी खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा ताबा घेतला आहे.

याद्वारे कर्जदार आणि सर्वसाधारण जनतेला सूचित करण्यात येते की, त्यांनी या मालमत्तेबाबत कोणतेही व्यवहार करू नयेत; कारण या मालमत्तेवर 'बँक ऑफ बडोदा'चा ३१.०८.२०२४ रोजीच्या स्थितीनुसार **५४,२४,९४३.४७ रुपये (अक्षरी: चौपन्न लाख चोवीस हजार नऊशे त्रेचाळीस रुपये आणि सत्तेचाळीस पैसे मात्र)** इतकी रक्कम, तसेच त्यावर होणारे व्याज आणि इतर शुल्क यांचा बोजा आहे.

तारण ठेवलेली मालमत्ता परत मिळवण्यासाठी उपलब्ध असलेल्या कालावधीबाबत, संबंधित कायद्याच्या कलम १३ (८) मधील तरतुदींकडे कर्जदार/जामीनदार/तारणकर्ता यांचे लक्ष वेधण्यात येत आहे.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**

१. सध्याचा आणि भविष्यातील साठा व इतर चालू मालमत्तेवर हायपोथिकेशन., २. गाव कोळगाव, पालघर (पूर्व), जिल्हा पालघर - ४०१४०४ येथील 'जेनेसिस इंडस्ट्रियल टाउनशिप', प्लॉट क्र. २९५, २४३ (भाग) व २४४, इमारत क्र. सीएफसी-बी, फेज १, तळमजल्यावरील गाळा क्र. १२३ वर इक्विटेबल मॉर्टगेज.

**सही/-**
**दिनांक: ०२-०७-२०२६** **विनय भूषण**
**स्थळ: कोळगाव, पालघर (पूर्व)** **मुख्य व्यवस्थापक आणि प्राधिकृत अधिकारी**

GRETEX

**ग्रेटेक्स कॉर्पोरेट सर्व्हिसेस लिमिटेड**
ए-४०१, चौथा मजला, प्लॉट एफपी-६१६ (पीटी), नमन मिडटाउन, सेनापती बापट मार्ग, इंडियाबुल्सजवळ, दादर (पश्चिम), मुंबई - ४०००१३
**संकेतस्थळ :** www.gretexcorporate.com, **ई-मेल आयडी :** info@gretexgroup.com
**संपर्क क्रमांक :** ०२२६९३०८५००
**सीआयएन :** L74999MH2008PLC288128

**अठराव्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना आणि रेकॉर्ड तारीख, लाभांश व ई-मतदान यांबाबतची माहिती**

**वार्षिक सर्वसाधारण सभा**
याद्वारे **सूचना** देण्यात येते की, कंपनी कायदा २०१३ आणि त्यांतर्गत केलेले नियम, तसेच सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ (यासोबतच कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालय ('एमसीए') आणि सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया ('सेबी') यांनी यासंदर्भात जारी केलेले संबंधित परिपत्रक) यांच्या सर्व लागू तरतुदींचे पालन करून, कंपनीच्या सदस्यांची अठरावी वार्षिक सर्वसाधारण सभा ('एजीएम') **शुक्रवार, ३१ जुलै २०२६ रोजी दुपारी ४:०० वाजता (आयएसटी)** खालील पत्त्यावर आयोजित केली जाईल: ए-४०१, चौथा मजला, प्लॉट एफपी-६१६ (पीटी), नमन मिडटाउन, सेनापती बापट मार्ग, इंडियाबुल्सजवळ, दादर (पश्चिम), मुंबई ४०००१३, महाराष्ट्र, भारत. या सभेत 'एजीएम'च्या सूचनेमध्ये नमूद केलेले कामकाज पार पाडले जाईल.

एमसीए आणि सेबी च्या परिपत्रकांनुसार, ज्या सदस्यांचे ई-मेल पत्ते कंपनी/डिपॉझिटरीज/डिपॉझिटरी पार्टिसिपंट्स किंवा बिगशेअर सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड, आरटीए कडे नोंदणीकृत आहेत, त्यांनाच आर्थिक वर्ष २०२५-२६ साठीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना आणि वार्षिक अहवाल योग्य वेळी केवळ इलेक्ट्रॉनिक स्वरूपात पाठवले जातील. एजीएम सूचना आणि आर्थिक वर्ष २०२५-२६ चा वार्षिक अहवाल कंपनीच्या https://gretexcorporate.com/ या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत; तसेच ते स्टॉक एक्स्चेंजची संकेतस्थळे बीएसई लिमिटेड - www.bseindia.com आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया - www.nseindia.com) आणि ई-व्होटिंग एजन्सीचे संकेतस्थळ (बिगशेअर सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड- https://ivote.bigshareonline.com) येथेही उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

याव्यतिरिक्त, ज्या सदस्यांनी वार्षिक अहवाल आणि इतर पत्रव्यवहार इलेक्ट्रॉनिक पद्धतीने मिळवण्यासाठी त्यांचे ई-मेल पत्ते अद्याप नोंदवलेले किंवा अद्ययावत केलेले नाहीत, त्यांनी कृपया संबंधित डीपीद्वारे सुचवलेल्या प्रक्रियेनुसार त्यांच्या डीमॅट खात्यामध्ये हे तपशील नोंदवावेत किंवा अद्ययावत करावेत.

सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ (ज्यामध्ये वेळोवेळी सुधारणा केल्या गेल्या आहेत) च्या नियम ३६(१)(ब) नुसार, ज्या भागधारकांचे ई-मेल आयडी नोंदणीकृत नाहीत, त्यांना प्रत्यक्ष पत्रव्यवहार पाठवला जाईल. यामध्ये कंपनीच्या संकेतस्थळाची वेबलिंक आणि अचूक मार्ग नमूद केलेला असेल, जिथून वार्षिक अहवाल पाहता येईल.

**लाभांश आणि रेकॉर्ड तारीख:**
संचालक मंडळाने ७ मे २०२६ रोजी झालेल्या बैठकीत, ३१ मार्च २०२६ रोजी संपलेल्या वर्षासाठी १० रुपये दर्शनी मूल्य असलेल्या प्रति शेअर ०.७० रुपये इतका अंतिम लाभांश देण्याची शिफारस केली आहे. प्रस्तावित लाभांश मिळण्यास पात्र असलेल्या सदस्यांची निश्चिती करण्यासाठी कंपनीने **शुक्रवार, १७ जुलै २०२६** ही 'रेकॉर्ड डेट' म्हणून निश्चित केली आहे.

तसेच, कृपया नोंद घ्यावी की १९ नोव्हेंबर २०२५ पासून लागू झालेल्या सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ मधील नियम १२ मधील सुधारणेनुसार, ज्या भागधारकांचे बँक खाते तपशील अद्ययावत नाहीत, त्यांना कंपनी भौतिक साधनांद्वारे लाभांश देऊ शकणार नाही.

**ई-मतदान:**
कंपनी कायदा २०१३ चे कलम १०८, त्यासोबत वाचले जाणारे कंपनी (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम २०१४ चे नियम २० आणि सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ चे नियम ४४ यांच्या अनुषंगाने, कंपनीने 'बिगशेअर सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड' द्वारे आपल्या सदस्यांसाठी इलेक्ट्रॉनिक मतदान सुविधा उपलब्ध करून दिली आहे.
रिमोट ई-मतदानाशी संबंधित तपशील खालीलप्रमाणे आहेत:

| | |
|---|---|
| मतदानासाठी पात्रता निश्चित करण्याची अंतिम तारीख | **शुक्रवार, २४ जुलै २०२६** |
| रिमोट ई-मतदानाची सुरुवात | **मंगळवार, २८ जुलै २०२६ रोजी सकाळी १०:०० वाजता** |
| रिमोट ई-मतदानाची समाप्ती | **गुरुवार, ३० जुलै २०२६ रोजी सायंकाळी ५:०० वाजता** |

सदस्यांनी कृपया नोंद घ्यावी की, केवळ 'कट-ऑफ' तारखेला म्हणजेच **शुक्रवार, २४ जुलै २०२६** रोजी 'सदस्य नोंदवही' किंवा 'लाभार्थी मालकांच्या नोंदवहीत' ज्यांची नावे समाविष्ट आहेत, तेच सदस्य वार्षिक सर्वसाधारण सभेच्या (एजीएम) सूचनेमध्ये नमूद केलेल्या ठरावांवर मतदान करण्यास पात्र असतील. एकदा का एखाद्या सदस्याने ठरावावर मतदान केले, की त्यानंतर त्यांना ते बदलण्याची परवानगी दिली जाणार नाही. ३० जुलै २०२६ रोजी सायंकाळी ५:०० वाजल्यानंतर 'रिमोट ई-व्होटिंग' सुविधा बंद केली जाईल.

ज्या सदस्यांनी 'रिमोट ई-व्होटिंग'द्वारे मतदान केले आहे, ते वार्षिक सर्वसाधारण सभेत (एजीएम) सहभागी होऊ शकतात, परंतु त्यांना पुन्हा मतदान करण्याचा अधिकार नसेल. ज्या सदस्यांनी 'रिमोट ई-व्होटिंग'द्वारे मतदान केलेले नाही आणि जे वार्षिक सर्वसाधारण सभेला उपस्थित आहेत, ते सभेदरम्यान 'बिगशेअर सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड' द्वारे पुरविल्या जाणाऱ्या इलेक्ट्रॉनिक मतदान सुविधेचा वापर करून मतदान करू शकतील.

**संचालक मंडळाच्या वतीने आणि त्यांच्याकरिता**
**सही/-**
**दिनांक: ५ जुलै २०२६** **भावना देसाई**
**स्थळ: मुंबई** **ग्रुप हेड - विधी, कंपनी सचिव आणि अनुपालन अधिकारी**